NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक १०.०५.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०९.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०७ ईसमांवर कारवाई करून ८,९२०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे..

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३६९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२८,६५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— अग्नी शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०९.०५.२०२६ चे १९.४५ वा. ते ०१.४० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, आमीन उर्फ पटेल खान, रा. हसनबाग, नंदनवन, नागपुर हा आपले राहते घरी स्वत:चे ताब्यात अग्नी शस्त्र बाळगुन आहे. अशा प्राप्त माहितीवरून पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, हसनबाग, प्लॉट नं. २४२, गुड्डू हाजीचे घराजवळ, नागपूर येथे राहणारा आरोपी नामे आमीन उर्फ पटेल सलीम खान, वय १९ वर्षे याचे राहते घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता, तो आपले ताब्यात ०१ देशी बनावटीची लोखंडी सिल्व्हर व काळ्या रंगाची पिस्टल मॅग्झीनसह अग्नीशस्त्र व ०२ जिवंत काडतुस बाळगुन समक्ष मिळुन आला. आरोपीस नमुद अग्नीशस्त्राबाबत विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे वसीम चिरा नावाचा ईसम वय अं. ४५ वर्षे, रा. शांतीनगर, स्मशानघाट जवळ, नागपूर याचे मदतीने आणल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक प्राणघातक अग्नीशस्त्र पिस्टल व ०२ जिवंत काडतुस असा एकुण किंमती ५२,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख व त्यांचे पथकाने केली.

## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— मोबाईल दुकानात फोडुन चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी प्रथमेश पुरूषोत्तम कामोने, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. ६२, श्री नगर ०१, मानेवाडा, हनुमान मंदीर जवळ, नागपूर यांचे पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट नं. ०३, गिता नगर, मातृछाया बिल्डींग, मानेवाडा रोड येथील दुकानाच्या चाळीतील दुकान नं. ०३ मध्ये मोबाईलचे शॉप आहे. दिनांक ०८.०५.२०२६ चे १८.३० वा. ते दि. ०९.०५.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी आपले मोबाईल शॉपीचे शटरला कुलूप लावून राहते घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटरचे लॉक तोडुन, आंत प्रवेश करून, सॅमसंग, ओपो, मोटोरोला, रेडमी, रिअलमी, पोको, आयफोन अशा वेगवेगळ्या कंपनीचे तसेच, दुरूस्ती करीता आलेले जुने मोबाईल फोन आणि रोख १५,०५०/—रू. असा एकुण किंमती ३,२६,८३८/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. पंकज जाधव ७६२०३३९०२६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०९.०५.२०२६ चे १०.३० वा. चे सुमारास, फिर्यादी नामे श्रीमती मृणालीनी जागेश्वर बारसागडे, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. ४२, अंबीका नगर, प्रिन्स लॉन जवळ, नरसाळा रोड, हुडकेश्वर, नागपूर ह्या त्यांचे ॲक्टीवा क्र. एम.एच. ३१ एफ.डी. ५१८० ने पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, उदय नगर चौक येथे सिग्नल रेड लागल्याने थांबून असता, आरोपी क्रेन क्र. एम.एच. ४९ बी.डब्लू. ६८०३ चे चालकाने त्याचे ताब्यातील क्रेन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे ॲक्टीवाला मागुन धडक दिल्याने, फिर्यादी ह्या ॲक्टीवासह खाली पडल्या. अपघातात फिर्यादीचे पायाला व छातीला मार लागल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. गंभीर जखमी यांचा उपचार केशव हॉस्पीटल येथे करण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे मसपोनि. चंदा दंडवते ९९२३०२३४१८ यांनी आरोपी क्रेन चालकाविरूध्द कलम २८१, १२५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**पोलीस ठाणे सोनेगाव :—** फिर्यादी जगदीश शिवपाल कामडी, वय ४० वर्षे, रा. पार्वती नगर, प्लॉट नं. १५, जिवन शाळेजवळ, अजनी, नागपूर हे अजनी कार्यालय, १२ नं. युनिट, वर्धा ते नागपूर रेल्वे लाईन दरम्यान ट्रॅकमॅन पदावर कार्यरत आहेत. फिर्यादी आपले कर्तव्यावर हजर असताना, दिनांक ०९.०५.२०२६ चे २१.३५ वा. चे सुमारास, त्यांना फोन द्वारे माहिती मिळाली की, रेल्वे डाऊन लाईन पोल नं. ८३०—२ बी एन ते ८२९—२८ एन चे दरम्यान, दोन अनोळखी पुरूष ईसमांचा अपघात झाला आहे. अशा माहितीवरून, फिर्यादी यांनी पोलीस ठाणे सोनेगाव हद्दीत, उज्वल नगर जवळील रेल्वे डाऊन लाईन पोल नं. ८३०—२बीएन ते पोल नं. ८२९—२४एन ते ८२९—२८एन दरम्यान पाहणी केली असता, तेथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे २५ ते ३० वर्षे वयाचे, हात, पाय, धड, डोके वेगवेगळे झालेल्या रक्त बंबाळ मृत अवस्थेत तसेच, दुसरा अनोळखी पुरूष वय अंदाजे २५ ते ३० वयाचे ज्याचे संपूर्ण शरीर व हातपाय तुटलेले असून, तो नग्न मृत अवस्थेत

मिळुन आले. फिर्यादी यांनी पोलीसांना घटनास्थळी बोलावुन, पोलीसांनी दोन्ही शव पुढील कार्यवाहीस्तव एम्स हॉस्पीटल मिहान, नागपूर येथे पाठविले आहे. मृतकांची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सोनेगाव येथे मसपोनि. शितल चामोले ९५०३५८२५६१ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**